जा.क्र./पोउआ/वाह/ ११/५१ /२०१८

पुणे, दिनांक - २६ /१०/२०१८

**प्रेसनोट**

पुणे शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सीआर - ३७/टीआरए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन प्राप्त हरकती व सुचनांचा विचार करून मी तेजस्वी सातपुते, पोलीस उप-आयुक्त वाहतुक नियंत्रण शाखा, पुणे शहर, यापुर्वी या ठिकाणी काही पार्कींग निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरीकांनी याबाबत आपल्या काही सुचना असल्यास त्या पोलीस उप-आयुक्त, वाहतूक नियंत्रण शाखा, साधु वासवानी रोड, पुणे - १ यांचे कार्यालयात दिनांक - २६/१०/२०१८ ते दिनांक - ०९/११/२०१८ पर्यंत लेखी स्वरुपात कळवाव्यात. नागरीकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करून अंतिम आदेश काढण्यात येतील.

**विमानतळ वाहतूक विभाग पुणे अंतर्गत.**

**पुणे नगर रोडवर खराडी दर्गा चौक ते टाटा गार्ड रुम चौक पर्यत रोडचे दोन्ही बाजुस नो पार्किग करणेत येत आहे.**

सही/-

**(तेजस्वी सातपुते)**

पोलीस उप-आयुक्त,

वाहतुक शाखा ,पुणे शहर.